

follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com । पश्चिम महाराष्ट्र ।

CELEBRATING 25 YEARS OF JOURNALISM

RNI Regd. No. 72105/99 * वर्ष २६ * अंक ३४७ * गुरूवार दि.१९ सप्टेंबर २०२४ * पाने ४ * किंमत ५/-



गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या..

# लालबागच्या राजाला साश्रू नयनांनी भक्तांचा निरोप

**मुंबई :** ही शान कोणाची लालबागच्या राजाची, लालबागच्या राजाचा विजय असो.....अशा जयघोषात अतिशय भावपूर्ण वातावरणात लालबागच्या राजाचे विसर्जन करण्यात आले. मुंबईची शान असलेला लालबागचा राजाची मिरवणूक मोठ्या दिमाखात निघाली. बुधवारी सकाळी १०.३० च्या सुमारास लालबागच्या राजाचे विसर्जन करण्यात आले. यावेळी लाडक्या राजाला निरोप देण्यासाठी अलोट गर्दी चौपाटीवर लोटली होती. यानंतर समुद्रात 'लालबागच्या राजा' चे शाही विसर्जन करण्यात आले असून 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...'च्या गजरात लालबागच्या राजाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.

लालबागचा राजा सकाळी ६ च्या सुमारास गिरगावच्या चौपाटीवर दाखल झाला. गिरगाव चौपाटी परिसरात पहाटे पाचच्या सुमाराला मुसळधार पाऊस झाला आणि भर पावसातही विसर्जन सुरू होते. गिरगाव चौपाटी परिसरात चिंचपोकळीचा चिंतामणी आणि माजगावचा राजा सोबत लालबागचा राजाची मिरवणूकही भर पावसात सुरूच होती. लालबागचा राजाच्या दर्शन घेण्यासाठी गणेश भक्तांची रात्र पासून गिरगाव चौपाटीवर मोठी गर्दी पाहायला मिळाली. मुंबईतील लालबागमध्ये मंगळवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास लालबागच्या राजाची आरती घेऊन मिरवणुकीला सुरूवात झाली. पारंपारिक वेषातच भाविकांनी या मिरवणुकीत भाग घेतला. यावेळी ढोलताशांचा दणादणाट... फटाक्यांची आतषबाजी...गुलालाची उधळण आणि गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या... चा जयघोष अशा भारावलेल्या वातावरणात बाप्पाची मिरवणूक तब्बल २३ तास सुरू होती.



### लालबागच्या राजाचे गिरगाव समुद्रात शाही थाटात विसर्जन

**हायड्रॉलिक्सचा वापर यांत्रिक तराफ्याच्या सहाय्याने लालबागच्या राजाला खोल समुद्रात नेऊन निरोप दिला जातो. २२ तासांनंतरही गणेशभक्तांच्या उत्साहात कमी झालेला पाहायला मिळाला नाही. लालबागच्या राजाला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. लालबागच्या राजाला निरोप देण्यासाठी मिरवणूक मार्गावर मुंबईकरांनी अलोट गर्दी केली होती. तब्बल २३ तासांच्या उत्साहपूर्ण, जल्लोषात आणि ढोलताशांच्या दणदणाटात निघालेल्या मिरवणुकीनंतर लालबागच्या राजाचे गिरगाव समुद्रात शाही थाटात विसर्जन करण्यात आले.**

### राज्यात चोख पोलीस बंदोबस्त

**विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांसोबतच प्रशासकीय यंत्रणांनीही कंबर कसली होती. मोठ्या उत्साहात, थाटामाटात गणपती बाप्पाला निरोप दिला जात आहे. त्यासाठी किनारपट्टीवरही पोलिसांनी यंत्रणा उभी केली आहे.**

## युनेस्कोचे पथक सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग किल्ल्याला देणार भेट

**सावंतवाडी :** युनेस्कोचे पथक दि. ६ व ७ ऑक्टोबर रोजी विजयदुर्ग, सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट देणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांचा जागतिक वारसास्थळांमध्ये समावेश करण्याच्या अनुषंगाने युनेस्कोचे पथक विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट देणार आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरिक, स्वयंसेवी संस्था, पक्ष, संघटना, अधिकारी आणि कर्मचारी, ग्रामस्थ, एन.एस.एस, एन.सी. सी, विविध सामाजिक मंडळे, सामाजिक संस्था व शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या दोन्ही किल्ल्यांच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी केले आहे.




पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत राज्यातील मराठा लष्करी स्थापत्य यांना युनेस्को जागतिक वारसा नामांकन मिळण्यासाठी नामांकन प्रस्ताव सादर केलेला आहे. जागतिक वारसा म्हणून किल्ले विजयदुर्ग व किल्ले सिंधुदुर्ग यांचे संवर्धन व संगोपण करण्याच्या अनुषंगाने युनेस्कोचे पथक दि.६ ऑक्टोबर रोजी विजयदुर्ग तर ७ ऑक्टोबर रोजी सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट देणार आहे.

दुर्ग वैभव हे महाराष्ट्राच्या अस्मितेचा वारसा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांप्रती नागरिकांचे भावनिक नाते आहे. आपल्या जिल्ह्यातील दोन किल्ल्यांची दखल जागतिक पातळीवर घेतली जाणार आहे. त्यामुळे किल्ल्याची देखभाल करणे, त्याचे जतन व संवर्धन करणे व सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांची स्वच्छता ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. २ ऑक्टोबर हा दिवस 'स्वच्छ भारत दिवस' (डइउ) म्हणून साजरा केला जाणार आहे. त्या निमित्ताने 'स्वच्छता ही सेवा' (डक्ड) २०२४ मोहीम दि. १७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

## पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूक २८ तासांनी संपली

**पुणे :** शहरातील गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीला महात्मा फुले मंडई येथील पुतळ्यापासून काल सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मानाचा पहिला कसबा गणपतीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आणि ढोल-ताशांच्या गजरात सुरुवात झाली. त्यानंतर आज दुपारी ३ वाजता भवानी पेठेतील महाराष्ट्र तरुण मंडळांच्या मिरवणुकीने सांगता झाली. ही विसर्जन मिरवणूक तब्बल २८ तास चालली, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी पोलिस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, उपायुक्त संदीपसिंह गिल हे उपस्थित होते. यावेळी अमितेशकुमार म्हणाले की, गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीकरिता जवळपास आठ हजार अधिकारी, कर्मचारी बंदोबस्तावर होते, त्यामुळे शहरात मोठ्या उत्साहात मिरवणूक पार पडली. तसेच लेझर लाईटवर बंदी घालण्यात आली होती. तरीदेखील काही ठिकाणी लेझर लाईटचा वापर केल्याची माहिती समोर येत असून काही मंडळांनी डेसिबलचीदेखील मर्यादा ओलांडल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे अशा मंडळांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.



मात्र, आता माझ्याकडे त्याबाबत संख्या उपलब्ध नसल्याचे अमितेशकुमार यांनी सांगितले.

तसेच या सर्व घडामोडीदरम्यान सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने योग्य नियोजन केल्याने दुपारी ३ वाजेपर्यंत ही मिरवणूक चालली. या मिरवणुकीत दरवर्षीप्रमाणे यंदादेखील अखेरचा मंडळ भवानी पेठेतील महाराष्ट्र तरुण मंडळ हे गणपती विसर्जनासाठीचे शेवटचे मंडळ ठरले असून ही मिरवणूक २८ तास चालल्याचे त्यांनी सांगितले.



### मानाच्या पहिला कसबा गणपतीचे थाटात विसर्जन

**पुणे :** ग्रामदैवत आणि मानाचा पहिला कसबा गणपतीचे विसर्जन झाले. कसबा गणपती टिळक चौकात आल्यानंतर गणपती बाप्पा मोरयाचा जोरदार घोष झाला. कसबा गणपती मंडळाची मिरवणूक पारंपरिक पद्धतीने सकाळी साडेदहा वाजता चांदीच्या पालखीतून निघाली. बेलबाग चौकातून लक्ष्मी रस्ता मार्गे विसर्जन मिरवणूक दुपारी ३.२५ वाजता टिळक चौकात आली.

उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार, उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पदाधिका-यांचे स्वागत केले. रमणबाग ढोल-ताशा पथक, गणेशोत्सवाची माहिती देणारा विशेष रथ, परशुराम आणि रूद्रगर्जना ढोल-ताशा पथक, प्रभात बँडपथकासह आर्ट ऑफ लिव्हिंग, कामायनी संस्था, रोटरी क्लबच्या परदेशी पाहुण्याचा मिरवणुकीत सहभाग कसबा गणपतीचे वैशिष्ट्य ठरले.

## तब्बल १७ तासाच्या विसर्जन मिरवणुकीनंतर अनंत चतुर्दशीच्या गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीची सांगता

**सातारा :** पुढच्या वर्षी लवकर या ..चा जयघोष करत सातारा शहरातील प्रमुख गणेश मंडळांची विसर्जन मिरवणूक तब्बल १७ तासानंतर समाप्त झाली.

सातारा येथील सातारा नगरपालिकेच्या मध्यवर्ती गणेश मंडळाच्या मिरवणुकीला सायंकाळी साडेपाच वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला. त्यानंतर अनेक मान्यवर मंडळ आमचे महागणूक गणेश मूर्ती या विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाल्या आणि रविवारी मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजता सुरू झालेली ही विसर्जन मिरवणूक आज बुधवारी सकाळी साडेनऊ वाजता मानाच्या शंकर-पार्वती गणेश मूर्तींचे विसर्जन तळ्यात विसर्जन झाल्यावर समाप्त झाली.

काल रात्री बारापर्यंत मंडळांच्या कडून लेझर आणि डॉल्बीचा दणदणाटाला जिल्हा व पोलीस प्रशासनाने बंदी घालूनही उधाण आले होते. रात्री बारानंतर मंडळाच्या पुढील सर्व वाद्य तसेच हे सर्व प्रकार थांबून पोलिसांनी मंडळांना गणेश मूर्ती विसर्जनासाठी पुढे नेण्यासाठी घाई करण्यास सुरुवात केली .पावसाने उघडीप दिल्यामुळे सायंकाळी सहा वाजल्यापासून राजवाडा ,मोती चौक, सदाशिव पेठ, राजपथ हा परिसर नागरिकांनी फुलून गेला होता. विविध मंडळांचे स्वागतासाठी साताराचे आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले स्वागत कक्षात उपस्थित होते. रात्री उशिरा अनेक कार्यकत्यांच्या मागणीवरून त्यांनीही मंडळाच्या पुढे स्वागत करून नाच करत ठेका धरला.

गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी व जोरजोरात सुरु असलेली वाद्य संगीत यामुळे या मिरवणुकीला एक वेगळाच नजारा प्राप्त झाला होता.

रात्री आठ ते बारा या वेळेत ही विसर्जन मिरवणूक अतिशय संथ गतीने पुढे, पुढे सरकत होती. मात्र रात्री बारानंतर वाद्य वाजवण्यास आणि थांबवण्यास पोलीस प्रशासनाने सांगितल्यानंतर या मिरवणुकीने विसर्जनासाठी वेग घेतला.

अनेक मंडळांच्या गणेश मूर्ती अतिशय महाकाय उंचीच्या असल्यामुळे त्या विसर्जन मिरवणूक मार्गावरून नेताना वारंवार अडथळे येत होते. सातारा शहरातील राजवाडा परिसरातील भव्य अशा कमानी मध्ये एका मंडळाचे मूर्तीची महिरप अडकल्यामुळे ती सोडवण्यासाठी बराच वेळ कार्यकर्त्यांना झटापट करावी लागली.

आज सकाळी दहाच्या सुमारास शनिवार पेठेतील राहुल परदेशी यांनी बनवलेल्या व मानाच्या शंकर-पार्वती गणेशाची विसर्जन मिरवणूक विसर्जनाने संपन्न झाली.

तत्पूर्वी मंगळवारी सकाळीच सातारा शहरातील मानाचा नवसाला पावणारा महासम्राट गणपती सदाशिव पेठ येथील पंचमुखी गणेश मंडळ अर्थात प्रताप मंडळ शनिवार पेठ येथील मान्यवर मंडळ तसेच मल्हार पेठ येथील मंडळाची मिरवणूक काढण्यात आली होती. अनेक अनेक गणेश मंडळांनी विसर्जन मिरवणुकी सहभागी होता आपापल्या पद्धतीने सायंकाळपर्यंत गणेश मूर्तींचे विसर्जन नेमून दिलेल्या विसर्जन तळ्यामध्ये केले जिल्हा प्रशासनाने मिरवणूक मार्गावर सीसी कॅमेरे तसेच पोलिसांची फौज वाढवून आणि ठिकठिकाणी होमगार्ड व स्वयंसेवकांची मदत घेऊन हे मिरवणूक शांततेत पार पाडली सातारा येथील बालाजी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मिरवणूक मार्गावर २४ तास कार्यरत असलेल्या सर्व पोलीस व होमगार्ड कर्मचाऱ्यांना जागेवर जाऊन भोजन पॅकेट्स वितरण केले गेली अनेक वर्षे ही परंपरा ट्रस्ट मार्फत राबविली जाते.

छाया : अतुल देशपांडे









सातारा गणेश विसर्जन मिरवणूक.. ढोल ताशांच्या निनादात काढलेली भव्य मिरवणूक. (सर्व फोटो.. अतुल देशपांडे, सातारा.)

# मालेगावमधील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला व बाल रुग्णालयाचे लोकार्पण



**पुणे :** दि. १८ सप्टेंबर रोजी मालेगाव येथील १०० खाटांच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला व बाल रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू निवृत्त लेफ्ट. जन. डॉ. माधुरी कानिटकर, मालेगाव महानगरपालिकेचे आयुक्त रवींद्र जाधव, मुख्यमंत्री जनकल्याण विभागाच्या समन्वयक डॉ. ज्योती वाघमारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे आदी उपस्थित होते. मालेगाव शहरातील कॅम्प भागात महिला व बालकांसाठी १०० खाटांचे

## १०० खाटांचे अत्याधुनिक सुविधांचे रुग्णालय

रुग्णालय सुरू करण्यात आले आहे. या रुग्णालयात महिला आणि १२ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांवर आधुनिक पध्दतीने उपचार केले जातील. त्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले

रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी शिवभोजन व्यवस्था

पालकमंत्री श्री. भुसे यांनी सांगितले की, या रुग्णालयात विविध सुविधा पुरवल्या जातील तसेच दरमहा आरोग्य तपासणी शिबिराच ` आयोजन करण्यात येईल. महत्वाचे म्हणजे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी शिवभोजन व्यवस्था केली गेली आहे. रुग्णालयाची शिस्त आणि स्वच्छता प्रत्येकानेच पाळली पाहिजे.

रुग्णालयात सीसीटिव्ही कार्यान्वित केले गेले आहेत. तसेच पोलिस चौकी उभारण्यात येईल, असेही

डॉ. कानिटकर म्हणाल्या की, वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून सर्व सामान्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याची संधी मिळाली. प्रत्येक महिलेने या रुग्णालयाचा लाभ घ्यावा. विकसित भारत घडविण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे.

प्रसुतीसाठी महिलांनी रुग्णालयातच दाखल व्हावे. बालकांना प्रत्येक डोस देत लसीकरण करून घ्यावे. त्याची मोफत सुविधा आहे. त्याबरोबरच महिलांनी स्वत:च्या आरोग्याची काळजी घ्यावी.

डॉ. शिंदे म्हणाले की, मालेगाव येथे महिला व बाल रुग्णालय कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यासाठी पालकमंत्री श्री. भुसे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी अतिशय सूक्ष्म पद्धतीने नियोजन केले. अतिशय सुसज्ज असे रुग्णालय साकारले आहे.

डॉ. वाघमारे म्हणाल्या की, अतिशय अत्याधुनिक असे रुग्णालय आहे.

त्याचा सर्व सामान्य कुटुंबातील महिलांना लाभ होणार आहे.

यावेळी या लोकार्पण सोहळ्यास महिला, नागरिक, आरोग्य यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

**नव्या महिला व बाल रुग्णालयामधील विविध विभाग**

आपत्कालिन वैद्यकीय सेवा २४/७

मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर

मॉड्यूलर लेबर रुम

क्ष - किरण व सोनोग्राफी सुविधा

प्रयोगशाळा तपासण्या , रक्त साठवणूक केंद्र

रुग्णवाहिका / मोफत संदर्भ व वाहतूक

मोफत औषध उपचार व पुरवठा

प्रसुतीपूर्व व पश्चात तपासणी

सिझेरीयन प्रसुती

नियमित लसीकरण

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया , इतर स्त्री रोग

# शेती विकासात खरेदी विक्री संघाचे भरीव योगदान

## ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर यांचे प्रतिपादन : कराड तालुका खरेदी विक्री संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**कराड** : कराड तालुका खरेदी विक्री संघाने तालुक्यातील शेती व शेतकरी विकासासाठी भरीव असे योगदान दिले असल्याचे प्रतिपादन रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अँड उदयसिंह पाटील-उंडाळकर यांनी केले.

कराड तालुका सहकारी खरेदी लि, कराड ची ८७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन अनिलराव मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.यावेळी सभेस रयत सहकारी साखर कारखान्याची व्हा चेअरमन आप्पासाहेब गरुड, कोयना दूध संघाचे चेअरमन लक्ष्मण देसाई ज्येष्ठ नेते वसंतराव जगदाळे, कोयना सहकारी बँकेचे चेअरमन रोहित पाटील,कराड बाजार समितीचे सभापती प्रकाश पाटील, प्रा. धनाजी काटकर माजी जिल्हा परिषद सदस्य प्रदीप पाटील, रामराव पाटील पतसंस्थेचे चेअरमन शहाजी गेवाळे,चार्टर्ड अकाउंटंट तानाजी जाधव, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



**कराड** : कराड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना उदयसिंह पाटील-उंडाळकर व्यासीठावर अनिल मोहिते, जगन्नाथ मोरे व इतर

यावेळी बोलताना ॲड. उदयसिंह पाटील पुढे म्हणाले, कराड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाने तालुक्यातील शेतकऱ्यांना खते, बी- बियाणे डिझेल व शेतीपूरक लागणारे फिनोलेक्स पाईप व औजारे तसेच आधुनिक तंत्रज्ञान मापक दराने उपलब्ध करून दिलेले आहे संस्थेने व्यवसायामधील नफा न पाहता शेतकऱ्यांना अल्प नफ्यामध्ये सेवा देण्याचे काम केलेले असून शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा नवीन बी- बियाणे वापरून शेतीकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून उद्योग म्हणून पहावे असे आवाहन त्यांनी केले.

अनिल मोहिते म्हणाले,कराड खरेदी विक्री संघाच्या हेड ऑफिस व एकूण २५ शाखा/विभागामार्फत ग्राहकांना सेवा पूरविली जाते. संघाकडे स्थावर व जंगम मालमत्ता रुपये २ कोटी ८६ लाख आहे. संघाचे खेळते भांडवल रुपये १० कोटी ५९ लाख एवढे आहे. गतवर्षी कमी पर्जन्यमानामुळे शेती व्यवसाय अडचणीत असताना संस्थेने सर्व शाखा विभागातुन शेतक-यांना सेवा पूरविलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये सुध्दा संस्थेने रुपये ७२ कोटी ०६ लाखाची उलाढाल केली आहे. त्यातून व्यापारी नफा रुपये १ कोटी ८५ लाख एवढा झालेला असून सर्व तरतूदी वजा जाता संस्थेस निव्वळ नफा रक्कम रुपये १२ लाख १५ हजार एवढा झालेला आहे. संस्थेस सतत ऑडीट वर्ग ''अ'' मिळालेला आहे.

संस्थेने नामांकित कंपनीची खते, बि- बियाणे, पत्रा पाईप, शेती औषधे, पशुखाद्य, शेती औजारे यासह सेवा पुरवण्याचे काम सुरुआहे. मार्केट यार्ड येथील खुल्या जागेमध्ये स्व. लोकनेते विलासकाका पाटील (उंडाळकर) यांचे नावांने व्यापारी संकुलन उभारणीचे काम प्रगती पथावर आहे . यावर्षी संस्थेने संस्था सभासद व व्यक्तिगत सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचे जाहीर केलेले आहे. तसेच स्वर्गीय लोकनेते विलास काका पाटील यांनी घालून दिलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे कामकाज चालू असून संस्थेला ॲड उदयसिंह पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

श्रद्धांजली ठराव संचालक प्रताप कणसे यांनी मांडला. व्हा. चेअरमन जगन्नाथ मोरे यांनी आभार मानले. सभेचे नोटीस वाचन सरवस्थापक शशिकांत पाटील यांनी केले. सूत्रसंचालन राजेंद्र जाधव यांनी केले. सभेस ज्येष्ठ संचालक हनुमंतराव चव्हाण, यशवंत बँकेचे चेअरमन महेशकुमार जाधव, बाळासाहेब जाधव, माजी सभापती प्रदीप पाटील, संपतराव इंगवले, मोहनराव माने, उध्दवराव फाळके, बाजार समितीचे उसभापती संभाजी काकडे, कराड संघाचे संचालक, संस्था प्रतिनिधी सभासद शेतकरी उपस्थित होते.



**शेणोली :** नवीन घरकुलाच्या भूमिपूजनप्रसंगी गटविकास अधिकारी प्रतापराव पाटील, समवेत अधिकारी, लाभार्ती, सरपंच, सदस्य व ग्रामस्थ.

# शेणोलीत नवीन घरकुलांच्या चाव्यांचे लाभार्थ्यांना वितरण

## गटविकास अधिकारी प्रताप पाटील यांची उपस्थिती

**कराड** : शेणोली, ता. कराड येथे प्रधानमंत्री आवास घरकुल योजना सन २०२४-२५ अंतर्गत रविवार, दि. १५ रोजी नवीन घरकुलांचे भूमिपूजन, पूर्ण झालेल्या घरकुलांच्या चावीचे सुभद्रा होनाळे व जयवंत कणसे या लाभार्थ्यांना वितरण गटविकास अधिकारी प्रतापराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विस्तार अधिकारी पोतदार, बोलके, अक्षय पाटील, संदेश कदम, सरपंच संतोष कणसे, ग्रा. पं. सदस्य चंद्रकांत दाभाडे, जयवंत कणसे, नारायण शिंगाडे, संपत गायकवाड, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कन्याशाळा मलकापूरचा मुलींचा संघ शालेय जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत द्वितीय

## दोन खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी जिल्हा संघात निवड

**कराड** : सातारा जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय सातारा यांचे वतीने सोमवार दि. ९ सप्टेंबर ते १० सप्टेंबर २०२४ रोजी शालेय जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धा कराड येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या कन्याशाळा मलकापूरचा १७ वर्षे मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. यामध्ये प्रगती शेळके, श्रावणी शिर्के, हार्दिका पाटील, अस्मिता शिर्के, अंकिता पाटील या खेळाडू विदयार्थिनींनी उत्कृष्ट खेळ केला व विजयाची परंपरा अखंड ठेवली. १४ वर्ष मुलींच्या संघानेही कन्याशाळेच्या क्रीडाक्षेत्राला साजेशी कामगिरी केली.



**मलकापूर** : विजेत्या खेळाडूंसमवेत डॉ. स्वाती थोरात व शिक्षक

सदर स्पर्धेतील चमकदार कामगिरीच्या जोरावर कन्याशाळेच्या १७ वर्ष मुलींच्या संघातील कु. प्रगती शेळके, कु. श्रावणी शिर्के या खेळाडूंची फेरवण येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी जिल्हा संघात निवड झाली आहे. या निवडीने श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या व कन्याशाळा मलकापूरच्या क्रीडाक्षेत्राच्या नावलौकिकात भर घातली आहे.

सर्व खेळाडूंना क्रीडाविभाग प्रमुख जयवंत पाटील, क्रीडा शिक्षक योगेश खराडे यांचे मार्गदर्शन लाभले. बौद्धिक विकासाबरोबर क्रीडानैपुण्याचा विकास करण्याचा ध्यास कन्याशाळेने घेतल्यामुळे पालक वर्गातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

सदर निवडीबद्दल सर्व यशस्वी व सहभागी खेळाडूंचे संस्थेचे सचिव शेतीमित्र अशोकराव थोरात, कराडचे उद्योजक लक्ष्मीनारायण सरलाया, संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग पाटील, उपाध्यक्ष भास्करराव पाटील, खजिनदार तुळशीराम शिर्के, मार्गदर्शक संचालिका डॉ. स्वाती थोरात, संचालक वसंतराव चव्हाण, प्रा. संजय थोरात, टेबल टेनिस प्रशिक्षक लक्ष्मण जिरंगे, मलकापूर केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश जाधव, मुख्याध्यापिका सुलोचना भिसे, पर्यवेक्षक सुरेश राजे, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी अभिनंदन केले.

# साहित्यखलख राजकारण निकोप साहित्याला घातक : पाटील

## सागरेश्वर संमेलन : सोमनाथ पाटील धों. म. मोहिते पुरस्काराने सन्मानित

**कडेगाव** : जात आणि धर्म नष्ट झाला पाहिजे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. सध्या आरक्षणावरून जाती-जातींमध्ये, धर्माधर्मात भिंत उभी राहिली जात आहे. साहित्यिकांनी जाती धर्मापलीकडे जाऊन लिहिंत झाले पाहिजे. कणखर भूमिका घेतली पाहिजे. साहित्यिकांतही गटबाजीचं राजकारण सुरू झाले आहे, हे साहित्याला अत्यंत घातक आहे, अशी खंत साहित्यिक दि. बा. पाटील यांनी व्यक्त केली.

देवराष्ट्रे (ता. कडेगांव) वृक्षमित्र धों. म. मोहिते चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे यशवंतराव चव्हाण वन्यजीव सागरेश्वर अभयारण्यात झालेल्या 'आपली शिदोरी-आपले संमेलन' व वृक्षमित्र धों. म. पर्यावरण संवर्धन पत्रकार पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ॲड.सुभाष पाटील अध्यक्षपदी होते. यावेळी ट्रस्टचे कार्याध्यक्ष रानकवी सु. धों. मोहिते, आयुष मंत्रालयाचे सेवानिवृत्त संचालक डॉ. अंकुश जाधव, डॉ. श्रीकांत पाटील, रघुराज मेटकरी, प्रा. विश्वनाथ गायकवाड, सिराज शिकलगार प्रमुख उपस्थित होते. यावेळी दि. बा.पाटील व मान्यवरांच्या हस्ते करुंगली (ता. शिराळा) पर्यावरण संरक्षण कार्यकर्ते सोमनाथ पाटील यांना 'वृक्षमित्र धों. म. मोहिते पर्यावरण संवर्धन पत्रकार' देऊन गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ,



**देवराष्ट्रे** : पुरस्कार वितरण कार्यक्रमप्रसंगी दि. बा. पाटील, ॲड. सुभाष पाटील, सु. धों. मोहिते, डॉ. अंकुश जाधव, डॉ. श्रीकांत पाटील व इतर मान्यवर

मानपत्र वरोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप होते. पोलीस निरीक्षक सलीम मुल्ला, सिराज शिकलगार, मारुती शिरतोडे, महेश मदने यांचा विशेष सत्कार झाला.

पाटील म्हणाले, वृक्षमित्र धों. म. मोहिते यांचे पर्यावरण क्षेत्रातील कार्य अतुलनीय असेच होते. अनेक संकटावर मात करून त्यांनी जिद्दीने सागरेश्वर अभयारण्याची निर्मिती केली. साहित्य हे समाजाला सांस्कृतिक चेहरा देण्याचं काम करते. मात्र साहित्यिकांच्यातही गटबाजीचं ग्रहण लागलं आहे ते साहित्य क्षेत्राला घातक आहे. ज्या साहित्याला लोकमान्यता मिळाली आहे, राष्ट्रीय पुरस्काराने गौरविले आहे अशा साहित्य कृतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले जात असेल तर ते दुर्दैव आहे.

सोमनाथ पाटील म्हणाले, निसर्ग आणि वन्यजीव यांचं संवर्धन होणं गरजेचं आहे. ॲड. सुभाष पाटील, रघुराज मेटकरी यांनी मनोगत व्यक्त केले.

रानकवी सु. धों. मोहिते यांनी स्वागत केले. प्रा. विश्वनाथ गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रोहित मोहिते यांनी मानपत्राचे वाचन केले. दत्तात्रय सपकाळ यांनी आभार मानले.

संमेलनास ओबीसीचे जिल्हाध्यक्ष सुनिल गुरव, धनदत्त बोरगावे, रमेश खंडागळे, रमजान मुल्ला, हिंमत पाटील, प्रवीण शिंदे, प्रा. बी. आर. कणसे, हिम्मत मलमे, कल्पना मलमे, रंजना शिरतोडे, मंगेश मोहिते, बाळासाहेब मोहिते, पद्माकर यादव, दीपक पवार, महेश मदने, सागर गोतपागर, तुकाराम पवार यांच्यासह साहित्यिक, पर्यावरणप्रेमी यांची उपस्थिती होती.

**बहारदार कविसंमेलन :**

- दुपारच्या वनभोजनानंतर झालेल्या दुसऱ्या सत्रात कविसंमेलन झाले. कवी धनंजय सोलनकर यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन पार पडले. संमेलनात अनिल पाटील, धनदत्त बोरगावे, रघुराज मेटकरी, सिराज शिकलगार, अशोक पवार, चंद्रकांत वेल्हाळ, प्रा. सिद्धेश्वर सपकाळ, सु. धों. मोहिते, शहाजी जाधव, तुकाराम पवार, प्रा. विश्वनाथ गायकवाड, एकनाथ गायकवाड, रमेश गायकवाड, एम. बी. जमादार, संजय नायकवडी, गणेश फलांडे, प्रकाश जाधव, मुरलीधर कुलकर्णी, प्रतिभा कुलकर्णी, सुनीता कुलकर्णी यांच्यासह कवींनी विविध प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या कविता सादर करून संमेलनाची रंगत वाढवली.

# कोयनेला जाता-येताना पालकमंत्र्यांना मार्ग का बदलावा लागतो : सुरेश पाटील

**पाटण** : पाटण तालुक्यात विकास कामांची मोठी दयनीय अवस्था झाली आहे. ही अवस्था तालुक्यातील जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. विकास कामात झालेल्या भ्रष्टाचाराचे पुरावे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व आमचे नेते हर्षद कदम यांच्या हाती लागले आहेत. आम्ही पुऱ्यावाणीशी बोलत असून पाटण तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास कामात झालेल्या भ्रष्टाचाराच्या विरोधात लोकशाही मार्गाने मोर्चा काढत आहोत. एवढीच तुम्हाला तुमच्या नेत्यांची बदनामीची भीती वाटत असेल तर आपण राहता त्या कोयनेला येताना पालकमंत्र्यांना मार्ग का बदलावा लागतो याचे उत्तर आपण तालुक्यातील जनतेला द्यावे. असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पाटण तालुकाप्रमुख सुरेश पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

गेल्या दहा वर्षापासून कराड चिपळूण मार्गाची दयनीय अवस्था झालेली आहे. या दहा वर्षात आपण सत्तेत आहात या काळात या रस्त्यावर करोडो रुपये खर्च झाले आहेत. रस्त्यावर खर्ची पडलेला पैसा जनतेचा आहे. गेल्या दहा वर्षांत अनेकवेळा रस्ता दुरुस्ती साठी आंदोलने झाली. आपलाही या रस्त्यावरील सततचा प्रवास आहे. आपल्या डोळ्यांना या रस्त्याची खराबी अद्याप दिसली नाही हे कोयना विभागातील जनतेचे दुर्दैव आहे. आपल्या नेत्यांचे ऐवढे मोठेपण आपण सांगत असाल तर हा रस्ता जगप्रसिद्ध झाला असून या रस्त्यावरील खड्डे अख्या जगाला गुगल मॅप वरून दिसत आहेत. हा रस्ता तुमच्या परीने चांगला होता तर पालकमंत्र्यांना कोयनेला येताना किंवा कोयनेवरुण परत जाताना मार्ग का बदलावा लागतो. याचे उत्तर आपण जनतेला द्यावे.

आपण पालकमंत्र्यांच्या नावे गावोगावी लावलेल्या फ्लेक्स बोर्डच्या आधारे आमच्या नेत्यांकडे पुरावे आले आहेत. या पुराव्यानिशी आम्ही बोलत आहोत. आमचे पुरावे खोटे पडले तर आम्ही जनतेची जाहीर माफी हि मागू. ऐवढे मोठेपण आमच्यात आहे. तसे तुम्ही विकास कामात भ्रष्टाचार झालाच नाही हे सिद्ध करून जनतेसमोर आणा. हर्षद कदम यांना तुम्ही लाचार म्हणतात याचे उत्तर तुमच्यातच आहे. लाचार कोण आहे हे तालुक्यातील जनतेला माहित आहे. आपण स्वतःला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचे वारस म्हणता तर एखादे स्मारक हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने तालुक्यात का केले नाही. असा प्रश्न तुम्ही तुमच्या नेत्यांना का विचारला नाही. सत्ता तुमची आहे. सरकार तुमचे आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# टेंभू, म्हैसाळ योजनांच्या लाभक्षेत्रातील निर्बंध हटले



## सांगली जिल्ह्यातील २९९ गावांना लाभ

**तालुकानिहाय गावे अशी**
**खानापूर - ९६, पलूस - १, कडेगाव - ३०, तासगाव - ४३, कवठेमहांकाळ - ४७, मिरज - ४६, आटपाडी - ३६**

**सांगली :** टेंभू, म्हैसाळ योजनांच्या लाभक्षेत्रातील शेतीवरील निर्बंध हटविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे २९९ गावांतील शेतीच्या खरेदी-विक्रीस मोकळीक मिळाली आहे. यामध्ये सर्वाधिक गावे खानापूर तालुक्यातील आहेत.

टेंभू आणि म्हैसाळ सिंचन योजना राबविताना शासनाने हजारो एकर जमिनींचे संपादन केले होते. या जमिनींवर योजना पूर्ण झाल्या, तरी मोठ्या प्रमाणात जमिनी शिल्लक होत्या. योजनांसाठी जमिनी लागतील म्हणून शासनाने लाभक्षेत्रातील २९९ गावांतील शेतजमिनींवर स्लॅब लागू केला होता. या जमिनींच्या सातबारा उताऱ्यांवर इतर हक्कांमध्ये पुनर्वसनासाठी राखीव असा शेरा नोंदविला होता. त्यामुळे या जमिनींचे खरेदी विक्री, हस्तांतरण किंवा गहाणवट यावर निर्बंध लागू होते. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी होत होती. हा स्लॅब उठविण्याची मागणी शेतकऱ्यांतून सातत्याने होत होती.

सिंचन योजना बहुतांश पूर्ण झाल्याने निर्बंधांची गरज नसल्याचे प्रशासनाचे मत होते. निर्बंध हटवावेत, असा प्रस्ताव पुणे विभागीय आयुक्तांनी मे २०२२ मध्ये शासनाला पाठविला होता. त्याला गेल्या ऑगस्टमध्ये शासनाने मंजुरी दिली. त्यामुळे या जमिनी आता शेतकऱ्यांच्या दृष्टीने मुक्त झाल्या आहेत. सातबारा उताऱ्यांवरील शेरे कमी होणार आहेत.



# प्रभू श्री विश्वकर्मा यांची विश्व कालिका सद्भावना ज्योतीचे सावळजमध्ये स्वागत

**तासगाव :** तासगाव तालुक्यातील सावळज येथे पांचाळ सुतार समाजाचे आराध्य दैवत प्रभू श्री विश्वकर्मा यांची विश्व कालिका सद्भावना ज्योतीचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व समाज बांधवांनी समाज वाढीसाठी एकत्र येऊन प्रयत्न करण्याची शपथ घेतली.

संभाजीनगर, वेरूळ येथे दि. १७ सप्टेंबर रोजी प्रभू विश्वकर्मा पूजन दिन साजरा करण्यात येतो.

यावेळी महाराष्ट्र, कर्नाटकातील समस्त समाजाचे बांधव उपस्थित असतात. विश्वकर्मा यांची विश्व कालिका सद्भावना ज्योत शिरसंगी कर्नाटक इथून कोल्हापूर जिल्हा व शिरोळ मार्गे, सांगली जिल्ह्यात कवठेमंकाळ-सावळज-वाळवा-कासेगाव या मार्गे पुढे जात असते.

सावळजमध्ये सद्भावना ज्योतीची जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी विविध ठिकाणी ज्योतीचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सावळजच्या माजी सरपंच वंदना सुतार, ग्रामपंचायत सदस्य शोभा सुतार, ज्येष्ठ महिला विमल सुतार, प्रभू विश्वकर्मा समाज संघटनचे उदय सुतार, सुनील सुतार,संजय सुतार, अमोल सुतार, शशिकांत सुतार, सिद्धेश्वर सुतार, अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्राला मिळणार ६६०० मेगावॅट वीज

**मुंबई :** महाराष्ट्राला पुढील २५ वर्षे ६६०० मेगावॅट वीज पुरवठा करण्याचे कंत्राट अदानी पॉवर या अदानी समूहाच्या कंपनीला मिळाले आहे. अदानी पॉवर ही वीज अपारंपारिक आणि औष्णिक प्रकल्पातून ही वीज निर्माण करणार आहे. राजस्थानातील जैसलमेर येथील पवन-सौर ऊर्जा प्रकल्पातून अदानी ग्रीन एनर्जी मार्च २०२३ पासून मुंबईला हरित ऊर्जेचा पुरवठा करत आहे.

नवीन करारामुळे अदानी ग्रीन एनर्जी आणि अदानी पॉवर यांना महाराष्ट्रात त्यांचा विस्तार वाढवता येईल. अदानी ग्रीन एनर्जी गुजरातमधील कच्छ जिल्ह्यातील खवडा येथील त्यांच्या अक्षय ऊर्जा पार्कमधून ५ हजार मेगावॅट सौर उर्जा पुरवेल आणि अदानी पॉवर नवीन प्लांटमधून १,६०० मेगावॅट औष्णिक ऊर्जा महाराष्ट्राला पुरवेल.

२०२८ पर्यंत ३२ टक्के वीज अपारंपारिक उर्जा स्त्रोतांपासून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने अदानी पॉवरला कंत्राट दिल्याचे अधिकृतरित्या पत्र जारी केले आहे. दोन्ही कंपन्यांशी संबंधित वीज

# शिंदे-ठाकरेंची लढाई आता रंगमंचावर, राजकारण तापणारं




**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात अडीच वर्षांपूर्वी सर्वात मोठा भूकंप झाला. एकनाथ शिंदे यांनी आपल्या ४० समर्थ आमदारांसह शिवसेना सोडली. महाराष्ट्राच्या राजकारणात झालेल्या या सत्तांतरानंतर राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडल्या.हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. या सर्व राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिवसेना फुटीची कथा रंगमंचावर येणार आहे. अडीच वर्षांपूर्वी झालेल्या या राजकीय घडामोडींवर आधारित हे नाटक असून 'मला काहीतरी सांगायचंय' असं या नाटकाचे नाव आहे.

प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी हे नाटक लिहीले असून शिवसेना फुटीबद्दल आणि त्या दरम्यान पडद्यामागे घडलेल्या अनेक घडामोडी या नाटकाच्या माध्यमातून उलगडणार आहे. 'मला काहीतरी सांगायचंय' हे एकपात्री नाटक असेल. एकनाथ शिंदे यांच्या जीवनावर आधारित या नाटकात अभिनेता संग्राम समेळ हा मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. त्यामुळे या नाटकाबद्दल आता उत्सुकता निर्माण झाली आहे. सध्या हे नाटक सेन्सॉर बोर्डाकडे आहे. येत्या दोन दिवसात याबद्दल अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

गेल्या अडीच वर्षांत घडलेल्या घडामोडींनंतर राज्यात विधानभा निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीने निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. दावे प्रतिदावे सुरू आहेत. अशातच या नाटकाची घोषणा झाल्यामुळे या नाटकात नक्की काय पाहायला मिळणार, याबाबातही उत्सुकता वाढू लागली आहे. राज्यातील सत्तांतरापूर्वी धर्मवीर सिनेमा प्रदर्शित झाला होता. त्यानंतर अवघ्या काही दिवसातच एकनाथ शिंदेंनी ४० आमदरांसह शिवसेना सोडली, त्यानंतर आता जसजशा निवडणुका जवळ येऊ लागल्या आहेत. तसतशा घडामोडींनाही वेग आला आहे. विशेष म्हणजे धर्मवीर-२ सिनेमाही येत्या २७ सप्टेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे या चित्रपटातून आणि नाटकातून नेमकं काय पाहायला मिळणार, हे पाहणेही औत्सुक्याचे ठरणार आहे.

# कर्नाटकात १५ नोव्हेंबरनंतर गळीत हंगाम

## सीमाभागातील साखर कारखान्यांना दिलासा



**कोल्हापूर :** मागील वर्षी पाऊस कमी झाल्याने दुष्काळामुळेकर्नाटकातउसाचे उत्पादन कमी आहे. त्यामुळे यंदाचा साखर हंगाम १५ नोव्हेंबर नंतरच सुरू करावा, असे आदेशकर्नाटकसरकारने कारखान्यांना दिले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या अगोदर हंगाम सुरू होऊन उसाची होणारी पळवापळवी थांबणार असल्याने सीमाभागातील साखर कारखान्यांना काहिसा दिलासा मिळाला आहे.

कर्नाटकातील विशेषत: उत्तर भागातील साखर कारखान्यांचा गळीत हंगाम १ ऑक्टोबरपासूनच सुरू होतो. महाराष्ट्राच्या अगोदर साधारणत: महिनाभर हंगाम सुरू झाल्याने महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमा भागातील उसाची पळवापळवी होते. त्यामुळे सीमाभागातील साखर कारखान्यांच्या हंगामावर परिणाम होतो.


मात्र, गेल्यावर्षी महाराष्ट्र व कर्नाटकात पाऊस कमी झाला. कर्नाटकात वार्षिक सरासरीच्या जेमतेम ६० टक्केच पाऊस झाल्याने काही तालुक्यात उसाची लागवड कमी झाली. त्याचा परिणाम यंदाच्या हंगामावर होणार आहे. उसाची उपलब्धता कमी असल्याने यंदा गळीत हंगाम १ डिसेंबरला सुरू करण्याबाबत विचारविनिमय सुरू होता. कर्नाटक साखर संघ व सरकार यांनी १५ नोव्हेंबरच्या पुढे हंगाम सुरू करण्याचा निर्णय घेतला.

उशिरा हंगामाचे फायदे कमी कालावधीच्या उसात पाण्याचे प्रमाण खूप असते.परिपक्व उसाचे गाळप केल्यास शेतकऱ्यांना वजनही चांगले मिळते.साखर उतारा चांगला मिळाल्याने कारखान्यांचाही फायदा होतो. साधारणत: १३ ते १४ महिन्यांच्या उसाचे गाळप शेतकरी व कारखान्यांच्या दृष्टीने फायद्याचे ठरते.

### मंत्री समितीची बैठक आणि आचारसंहिता

**साखर हंगामाच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीची बैठक वेळेत होणे गरजेचे असते. या बैठकीत हंगामाबाबत धोरण ठरवले जाते. कर्नाटक सरकारने हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र सरकारने १ नोव्हेंबरपासून परवानगी दिली तर कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कारखान्यांच्या दृष्टीने फायदेशीर ठरू शकते. मात्र १५ ऑक्टोबरपासून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू शकते. तत्पूर्वी बैठक घेणे गरजेचे आहे.कर्नाटक सरकारचा हा निर्णय सीमाभागातील कारखान्यांच्या दृष्टीने फायदेशीर आहे. महाराष्ट्र सरकारने मंत्री समितीची बैठक लवकर घेतली तर कारखान्यांना हंगामाच्या तयारीसाठी पुरेसा वेळ मिळेल.**

# अनंत चतुर्थीला ३ हजार ४६० गणपती बाप्पाला गणेशभक्तांचा भावपूर्ण निरोप



**वसई :** मंगळवारी अनंत चतुर्थीच्या दिवशी वसई विरार शहरातील ३ हजार ४६० गणेश मूर्तींचे विसर्जन थाटामाटात आणि भावपुर्ण वातावरणात करण्यात आले. महापालिकेच्या उत्तम नियोजन आणि पोलीसांच्या चोख बंदोबस्ताला,अग्निशमन आणि नागरीक संरक्षण दलाची साथ लाभल्यामुळे आल्हाद दायक वातावरणात बाप्पाला निरोप देण्यात आला.

यामध्ये १ हजार ६३३ गणेशाचे कृत्रिम तलावात विसर्जन झाले. यात १ हजार ५५८ घरगुती आणि ७५ सार्वजनिक गणेश मूर्तींचा समावेश होता. तर १ हजार ८२७ मूर्तींचे विसर्जन हे नैसर्गिक तलाव, खाडी आणि समुद्रात झाले. अनंत चतुर्दशीला गणपती विसर्जनासाठी पालिकेने साडेतीन हजारांहून अधिक मनुष्यबळ तैनात केले होते. नागरिकांना विसर्जनाचे स्थळांची माहिती सहज मिळावी यासाठी जिओ टॅग लोकेशनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. मोठ्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी महापालिकेने ३ ठिकाणी जेट्टीच्या ठिकाणी विशेष तयारी बरोबर बोटी आणि तराफे दिले होते.निर्माल्य तलवात आणि नदीत विसर्जित करू नये यासाठी जागोजागी निर्माल्य कलश ठेवण्यात आले होते.

तसेच समुद्र किनारी विसर्जनस्थळी लाईफ जॅकेट,रिंग,गळ,बोट,मेगा फोन,दोरी अशा रेस्क्यू साहित्यासह अग्निशमन पथकही सज्ज ठेवण्यात आले होती. यासह जीवरक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. विसर्जन ठिकाणी घडणाऱ्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले होते. या सर्व ठिकाणी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेचे दोन्ही अतिरिक्त आयुक्त,सर्व उपायुक्त,प्रभागातील सहाय्यक आयुक्त यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध होते. विसर्जनाच्या मिरवणुकीदरम्यान एखादी दुर्घटना घडल्यास त्यांच्यावर तातडीने उपचार मिळावे यासाठी वैद्यकीय आरोग्य विभागाकडून प्रभाग निहाय आरोग्य पथके ही विसर्जन स्थळी नियुक्त करण्यात आली होती.याशिवाय १५ रुग्णवाहिका आणि जागोजागी फिरत्या शौचालयाचीं सोय उपलब्ध करून देण्यात आली होती.

### कृत्रिम तलावात ५८.९१ टक्के विसर्जन

**गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावा यासाठी पालिकेने विसर्जनासाठी ५८ ठिकाणी १०५ कृत्रिम तलावांची निर्मिती केली होती.तर २ बंद असलेल्या दगड खाणींच्या ठिकाणी कन्वेअर बेल्टची सुविधा उपलब्ध करून दिली होती. गणेशभक्तांनी महापालिकेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद दिला.एकूण १० दिवसांच्या काळात दीड दिवसीय,पाच दिवसीय,गौरी-गणपती,सात दिवसीय आणि अनंत चतुर्दशी या विसर्जनाला ३३ हजार ७०१ गणेश मूर्तींचे विसर्जन झाले,यात १९ हजार ८५३ मूर्ती या कृत्रिम तलावात विसर्जित करण्यात आल्या.**

# कोल्हापुरातील शिंगणापूरला चुकीच्या ठरावाने गोंधळ

## ग्रामपंचायतीने केला खुलासा



**कोल्हापूर :** शिंगणापूर (ता. करवीर) ग्रामपंचायतीने नवीन मतदार नोंदणी करतेवेळी अल्पसंख्याक (मुस्लीम) यांची नोंदणी करू नये, असा ठराव केल्याचे पत्र व्हायरल झाल्यानंतर संभ्रम निर्माण झाला होता; पण ही चूक लक्षात आल्यानंतर ग्रामपंचायतीच्या वतीनेमुस्लीमनव्हे, तर बांगलादेशी अल्पसंख्याकांची नोंदणी करू नये, असे स्पष्टीकरण देण्यात आले असले तरी करवीरच्या गटविकास अधिकाऱ्यांनी लेखी खुलासा मागितला आहे.


मे महिन्यात नागदेवाडी (ता. करवीर) येथील एका कॉलनीत बनावट आधार कार्ड बनवून राहत असलेल्या बांगलादेशी महिलांना पोलिसांनी अटक केली होती. यावर, २८ ऑगस्टला झालेल्या शिंगणापूर गावसभेत चर्चा होऊन सतर्कता बाळगण्याची सूचना ग्रामस्थांनी दिली होती. हा ठराव करताना बांगलादेशी असे म्हणण्याऐवजी अल्पसंख्याकमुस्लीमअसा शब्द वापरला होता. हे पत्र व्हायरल झाल्यानंतर त्यावर उलटसुलट चर्चा सुरू झाली. याबाबत, सरपंच यांच्याशी संपर्क साधला असता, असा कोणताही उद्देश ग्रामपंचायतीचा नाही. अनवधानाने बांगलादेशी मुस्लीमऐवजी मुस्लीम हा शब्द पडल्याचे सांगितले.

गावसभा होऊन वीस दिवस झाले, मग आता ही ठरावाची प्रत कोणी व्हायरल केली. यातून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न तर नव्हता ना? अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे.

**नागदेववाडी कॉलनीत बनावट आधार कार्ड बनवून दोन बांगलादेशी मुस्लीम महिला राहत होत्या. असा प्रकार आमच्या कॉलनीत होऊ नये यासाठी गावसभेत चर्चा होऊन ठराव झाला; पण यात बांगलादेशी मुस्लीम हा शब्द अनवधानाने नमूद करण्याचे राहिले. स्थानिक मुस्लीम समाजाला नियमानुसार मतदार नोंदणी करण्यास कोणाचीही हरकत नाही.**
**- रसिका पाटील (सरपंच, शिंगणापूर)**

**मुस्लीम नव मतदार नोंदणीबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव पंचायत समितीकडे प्राप्त नाही. तरीही व्हायरल पत्राबाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता अनवधानाने बांगलादेशी मुस्लीम शब्द राहून गेल्याचा तोंडी खुलासा दिला आहे; पण याबाबत लेखी खुलासा देण्याचे आदेश दिले.**
**- विजय यादव (गटविकास अधिकारी, करवीर)**

# नोकरी करत ६० गुंठ्यात रताळ्यातून कमवले ६.५ लाख



**सांगली :** आजकाल शेतीकडे फारसा तरुणांचा कल नसतो. सगळे जण नोकरीच्या शोधात पुणं-मुंबई गाठतात. नोकरी करणाऱ्याला कशी शेती करता येईल असे सगळे समज सांगलीच्या रामराव पाटील या तरुणाला लागू होत नाहीत. पेश्याने अभियंता असणाऱ्या सांगलीच्या या तरुणानं एकीकडे इंजिनिअर म्हणून खासगी कंपनीत नोकरी स्विकारली आणि दुसरीकडे अवघ्या ६० गुंठ्यात रताळ्याचं उत्पादन घेतलं. या रताळ्याच्या पिकातून या तरुणाला तब्बल ६.५ लाख रुपयांचं उत्पन्न मिळालंय.

प्रयोगशीलता हा गुण अंगी असल्यानं आवडीतून या तरुणानं आर्थिक प्रगती साधली आहे. शेतात वेगवेगळे प्रयोग करत रताळे लाऊन पाहीले. साठ गुंठे क्षेत्रातून या तरुणानं ९ टन रताळ्याचं उत्पादन काढलं आहे.

सांगलीच्या तरुणानं ६० गुंठ्यातून काढलं ९ टन उत्पादन

शेतीत सर्वात महत्वाचं काय? जमीन, माती, पाणी आणि नंतर पीक. पण त्याहीपेक्षा आव्हानात्मक पीकाचा फेरपालट करणं. तेचतेच पीक घेतल्यानं मातीचा पोत बिघडतो त्यामुळे अनेक शेतकरी पीक फेरपालट करण्यासाठी भुईमुग, सोयाबीन रताळं अशा पिकांचा वापर करतात. मातीच्या आरोग्याचं महत्व ओळखून रामराव पाटील यांनी ६० गुंठ्यात रताळं लावण्याचा प्रयोग करून पाहिला. उत्तम काळजी घेतली. ऑगस्ट महिन्यात रताळ्याची काढणी करण्यात आली व त्यांना जवळपास नऊ ते दहा टन उत्पादन मिळाले. या रताळा लागवडीतून त्यांना साडेसहा लाख रुपयांचा फायदा झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**नोकरीसोबत केली शेती, रताळ्यातून लखपती**


सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील बोरगावचे रामराव पाटील या तरुणानं इंजिनिअरिंगची पदवी घेतली. त्यानंतर ते एका खासगी कंपनीत नोकरी करतात. या तरुणानं नोकरी करत असताना शेतीची आवड जपण्याचा त्यांना प्रयत्न केला. योग्य व्यवस्थापन केल्यानं नोकरी आणि शेतीची सांगड घालत त्यांनी रताळ्यातून लाखो रुपये कमावले आहेत.

**मुंबईच्या बाजारात रताळे विकले**

राज्यात कोणत्याही उपवासाला रताळ्याचे काप, रताळ्याचा कीस आणि रताळ्याचे कितीतरी वेगवेगळे पदार्थ होतातच. पण सांगलीच्या शेतकऱ्यानं रताळ्याची केवळ ६० गुंठ्यात लागवड करत ९ ते १० टन रताळ्याचं पीक काढलं. या रताळ्यांची मुंबईच्या बाजारात विक्री करत टनामागे साधारण ७० हजार रुपयांचा भाव मिळवला.

**रताळं हे तीन महिन्याचं पीक**

रताळं हे मुळातच तीन ते साडेतीन महिन्यांचं पीक आहे. लागवडीनंतर आवश्यकतेनुसार, कीटकनाशकाची फवारणी करून पिकाला नीट पाणी पुरवत रामराव पाटील या तरुणानं ऑगस्ट महिन्यात कापणी केली. तेंव्हा साधारण ९ ते १० टन उत्पादन निघाले.



# भारतीय पुरातत्व विभागाच्या पथकाकडून पन्हाळगडाची पाहणी

**पन्हाळा :** राज्य शासनाने मराठा लष्करी किल्याचे जागतिक वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यासाठी जागतिक वारसा स्थळाचे पथक येत्या ऑक्टॉबर महिन्याच्या पाच तारखेला पन्हाळगडाला भेट देणार आहे. त्या अनुषंगाने पन्हाळागडावरील ऐतिहासिक महत्त्व सांगणाऱ्या इमारतींच्या पुरातत्व खात्याकडून चालू असलेल्या डागडूजीची पाहणी करण्यासाठी दिल्लीतील भारतीय पुरातत्व विभागाचे अतिरिक्त महानिदेशक जान्हविच् शर्मा यांचे सह पाच जणांचे पथक पन्हाळगडावर आले होते.

या पाहणी दरम्यान अतिरिक्त महानिदेशक जान्हविच् शर्मा यांचे रोबर अधीक्षक पुरतात्वित शुभा मजूमदार, भारतीय पुरातत्व विभागाचे शेख मुही, दास, विजय चव्हाण, ‌बासाहे जंगले व इतर कर्मचारी यांनी पन्हाळगडाची पाहणी करून माहिती घेतली याप्रसंगी गडाचे मुख्य प्रवेशद्वार असलेला चार दरवाजा, येथील दोन्ही तलाव, धान्यकोठार, तीन दरवाजा, सज्जाकोठी या ऐतिहासिक वास्तूंची माहिती घेत पाहणी केली. व या ठिकणांची डागडुजी करून नैसर्गिक बाज कसा अबाधित राखता येईल या बाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच गडाचे मध्यवस्तीत असलेल्या धर्म कोटी या वास्तूची खात्याकडून चालू असलेल्या डागडूजीची पाहणी करून सूचना दिल्या.

# क्राईम

## वेगवेगळ्या घटनेत तीन युवती बेपत्ता

सातारा : वेगवेगळ्या घटनेत तीन युवती बेपत्ताझाल्याच्या फिर्यादी सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहरालगत उपनगरातून विविध दोन घटनेत तीन युवती बेपत्ता झाल्या आहेत. बेपत्ता होणार्या दोन युवती १९ वर्षाच्या व २१ वर्षीय एक युवती बेपत्ता झाल्या आहेत. ही घटना ११ सप्टेबर रोजी घडली असून सातारा शहर पोलीस ठाण्यात घटनेची नोंद झाली आहे.

## बेकायदा दारु विक्री प्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : बेकायदा दारु विक्री केल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, निगडी तर्फ सातारा येथे बेकायदा दारु विक्री प्रकरणी शंकर बाबा मसुगडे (वय ६०, रा. निगडी तर्फ सातारा) याच्या विरुध्द सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून ९१० रुपये किंमतीच्या १३ दारुच्या बाटल्या जप्त केल्या आहेत.

## आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

सातारा : गणेशोत्सव काळात तडीपारीचे आदेश असतानाही त्याचे उल्लंघन करुन सातार्यात बिनधोकपणे फिरणार्यांविरुध्द शहर पोलीस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अमित अर्जुन चव्हाण (वय २३, रा. महागाव ता.सातारा), संतोष गुलाब चव्हाण (वय २३, रा. महागाव), रविराज पृथ्वीराज चव्हाण (रा.महागाव), आशिष अर्जुन चव्हाण (रा.महागाव) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर पोलीस गस्त घालत असताना संशयित तडीपारीत असतानाही फिरत असल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## महिलेचा विनयभंग, मारहाण केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

सातारा : महिलेचा विनयभंग, मारहाण केल्याप्रकरणी दोघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पतीला फोन करते, त्यांना घरी बोलवते या संशयातून चुलत जावेला अंगावरील कपडे काढून मारहाण करत त्याचा व्हिडीओ बनवल्याप्रकरणी दोघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही मारहाण आईने व मुलाने केली असून विनयभंगाचाही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १३ सप्टेबर रोजी घडली आहे.

## हामदाबाज येथे २५ हजारांची घरफोडी

सातारा : हामदाबाज येथे अज्ञात चोरट्याने २५ हजारांची घरफोडी केल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, हामदाबाज ता.सातारा येथे बंद घर अज्ञात चोरट्यांनी फोडून घरातून २५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. ही घटना दि. ७ सप्टेबर १० सप्टेबर या कालावधीत घडली आहे. यापकरणी कलवंता पांडूरंग चव्हाण (वय ८५ , रा. हामदाबाज) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

## आर्थिक फसवणूक प्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : एकाची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, उसतोडणीसाठी कामगार देतो, असे सांगून ७ लाख ३० हजार रुपये घेवून फसवणूक केल्याप्रकरणी अनिल बंडू धोतरे (रा.टाकरवन ता.माजलगाव जि. बीड) याच्या विरुध्द सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यापकरणी प्रमोद जनार्दन चव्हाण (वय ५६, रा. महागाव ता.सातारा) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना दि. २०२० साली घडली आहे. संशयिताने ७ कोयते म्हणजेच १४ उसतोड कामगार देतो, असे सांगून ७ लाख ३० हजार रुपयांची एनएफटी करुन घेतली आहे.

## सातारा शहरातून दोन दुचाकींची चोरी

सातारा : सातारा शहरातून अज्ञात चोरट्यांनी दोन दुचाकींची चोरी केल्याच्या फिर्यादी सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहर परिसरातून दोन दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्या. यापकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल झाले आहेत. यापकरणी सुनील दर्गाप्पा पवार व सय्यद भिकू शेख यांनी पोलीस ठाण्यात तक्रारी दिल्या आहेत. ही घटना दि. १२ आणि १३ सप्टेबर रोजी घडली आह

# पारगावला येथे आज महाबेरोजगार मेळावा

**खंडाळा** : खंडाळा तालुक्यातील पारगाव येथे आज दि. १९ रोजी महाबेरोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

पारगांव (ता. खंडाळा) येथील मयुरमंगल कार्यालयात कामगार नेते,आमदार शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील स्थानिक भूमिपूत्रांच्या न्याय हक्कासाठी दि.१९ रोजी दुपारी एक वाजता महाबेरोजगार मेळावा होणार आहे.

लोकसभा निवडणुकी दरम्यान स्थानिक भूमिपुत्रांनी न्याय हक्कासाठी केलेल्या मागणी नुसार खंडाळा,शिरवळ,लोणंद शहरांसह परिसरातील स्थानिक भुमिपुत्रांना नोकरी,व्यवसाय मिळावा यासाठी सर्व सुशिक्षीत,असंघटीत, बेरोजगार युवकांनी आपले डॉक्युमेंट, बायोडाटा घेवून उपस्थित राहावे. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षच्या राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार नियनच्यावतीने करण्यात आले आहे.

## सातारच्या खेळाडूंची राज्यस्तरावर स्पर्धेसाठी निवड

**सातारा** : केंद्र शासनाच्या वतीने खेलो इंडीया ही योजना प्रतिभावंत खेळाडु तयार व्हावेत म्हणुन देशभर राबविली जाते. जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालयाच्या वतीने या योजनेर्तंगत जिल्हा खेलो इंडिया थलेटिक्स प्रशिक्षण केंद्र श्रीमंत छत्रपती शाहु क्रिडा संकुल सातारा येथे सुरु आहे. जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने दिनांक ४ व ५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत घेण्यात आलेल्या जिल्हास्तर मैदानी स्पर्धेत जिल्हास्तर खेलो इंडिया अँथलेटिक्स प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू सहभागी होऊन पुणे बालेवाडी येथे ११ खेळाडुचीं राज्यस्तर थलेटिक्स सपर्धेसाठी निवड झाली आहे.

# राज्यात तिसऱ्या आघाडीचे भवितव्य कठीण; सतेज पाटील

**कोल्हापूर** : राज्यातील जनतेसमोर महाविकास आघाडी आणि महायुती असे दोन पर्याय उपलब्ध आहेत. लोकांना स्थिर सरकार हवे आहे. लहान पक्षांचा टेकू नको आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत जनता तिसरी आघाडी स्वीकारणे कठीण आहे, असा विश्वास विधान परिषदेतील गटनेते, आमदार सतेज पाटील यांनी येथे पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांवर सतेज पाटील म्हणाले, विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकत चालली आहे. वाचाळवीरांच्या वक्तव्याला त्यांच्याच भाषेत आम्ही उत्तर देऊ शकतो, पण ती काँग्रेसची संस्कृती



नाही. भाजपच्या ५ खासदारांनीच त्यांचे सरकार घटना बदलणार असल्याचे म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली ही घटना अबाधित राहिली पाहिजे ही भूमिका राहुल गांधीनी मांडली. याची सत्यता लोकांनाही माहीत आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीमध्ये जागावाटपावरून बरेच वाद आहेत. अनके जिल्ह्यांत त्यांच्यात भांडणे आहेत. दुसरीकडे मविआत उत्तम समन्वय असून कोणतेही वाद नाहीत. बऱ्याच जागांवर एकमत झाले आहे. शंभरएक जागांवर चर्चा सुरु आहे. लोकसभेप्रमाणे एकमताने यावेळीही निवडणूक लढवू. मतदार महाविकास आघाडीच्या बाजूनेच कौल देईल, असेही पाटील म्हणाले.

## हातगाडी लावण्याच्या वादातून खून

**कोल्हापूर** : कोल्हापूरमध्ये गणेश विसर्जन मिरवणूक सुरू असतानाच शहरात एक धक्कादायक घटना घडली. हातगाडी लावण्याच्या वादातून इमरान इमाम मुजावर या तरुणाचा खून झाला आहे. हा प्रकार कोल्हापूरच्या आराम कॉर्नर येथे घडला. एकीकडे गणरायाला निरोप देण्याचा जल्लोष चालू असतानाच दुसरीकडे अशी घटना घडल्यामुळे कोल्हापुरात एकच खळबळ उडाली आहे..

इमरान मुजावर आणि युसूफ अलमजीद यांच्यात हातगाडी लावण्याच्या कारणावरून वाद झाला होता. वाद इतका विकोपाला गेला की, युसूफ अलमजीद याने चाकू वापरून इमरान मुजावरला भोसकले. गंभीर जखमी झालेल्या इमरानला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला.

### मोबाईल वरील अश्लील क्लिप पाहत

## अल्पवयीन मुलांकडून पाच वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार

**शिरवळ** : खंडाळा तालुक्यातील शिरवळ पोलिस ठाणे हद्दीतील एका गावात पाच वर्षीय बालिकेवर मोबाईल मधील अश्लील व्हिडिओ पाहून दोन अल्पवयीन मुलाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या घटनेने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

या अत्याचार प्रकरणी प्रकरणातील दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून शिरवळ पोलिस याबाबत चौकशी करून पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यातील शिरवळ पोलिस ठाणे हद्दीत एका गावात ही धक्कादायक घटना घडली. ही घटना सोमवारी (दि.१६) रोजी उघडकीस आली आहे. या घटनेची माहिती समजताच शिरवळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला. मात्र यावेळी आरोपीने पलायन केले होते. पोलिसांनी तपासाची चक्री वेगाने फिरवून संबंधित दोन्ही नराधम आरोपीना ताब्यात घेतले आहे.

दोन्ही कुटुंब बाहेर गावचे असून शिरवळ परिसरातील एका गावात भाडोत्री म्हणून राहत आहेत. पीडित बालिका आणि नराधम मुलाने हे शेजारी राहत आहेत. चार वर्षीय मुलगी संबंधित मुलांकडे खेळायला जात असे. रविवारी (दि.१५) रोजी पिडीत व आरोपी हे एकत्र खेळत असताना पीडितेला आरोपीने घराच्या टेरेस वर नेत मोबाईल मधील अशील क्लिप पहात अत्याचार करण्याचा केला या नंतर झालेली घटना पीडितेने आपल्या आईला सांगितली. याबाबत शिरवळ पोलिसांना माहिती मिळावी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत शिरवळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घडलेल्या घटनेची माहिती घेतली व आपली तपासचक्र फिरवत आरोपीला ताब्यात घेतले. यानंतर पीडित मुलीच्या आईने शिरवळ पोलीस स्टेशन या ठिकाणी याबाबत तक्रार दाखल केली. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस यांनी भेट दिली .पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस उपनिरीक्षक नयना कामठे करीत आहेत.

# महापालिकेच्या पर्यावरण पुरक गणेशोत्सवास

## सार्वजनिक मंडळांचा उस्फुर्त प्रतिसाद

**कोल्हापूर** : महानगरपालिका प्रशासनाच्यावतीने घरगुती व सार्वजनिक मंडळांनी यंदाचा गणेशोत्सव पर्यावरण पूरक करावा असे आवाहन करण्यात आले होते. यासाठी विसर्जनावेळी शहरात ठिक ठिकाणी महापालिकेच्यावतीने कृत्रिम विसर्जन कुंड ठेवण्यात आले होते. या उपक्रमाला कोल्हापूरकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सार्वजनिक विसर्जन मिरवणुकी वेळी सार्वजनिक मंडळांनी चारही विभागीय कार्यालय अंतर्गत १७२, घरगुती व मंडळांच्या लहान मूर्तीसह १०१५ गणेश मूर्ती या कृत्रिम विसर्जन कुंडाच्या ठिकाणी विसर्जित केल्या. या सर्व मुर्त्या महापालिकेच्या वतीने संकलित करुन इराणी खणीमध्ये पर्यावरण पूरक विसर्जीत करण्यात आल्या. महापालिकेला अर्पण केलेल्या आणि इराणी खन येथे सार्वजनिक मंडळांनी विसर्जित केलेल्या १०३५ मोठ्या गणेश मूर्ती व ११०१ लहान गणेश मुर्ती अशा २१३६ गणेश मुर्ती इराणी खण येथे पर्यावण पुरक विसर्जीत करण्यात आल्या. महापालिकेच्या मुर्तीअर्पण आवाहनास शहरातील अनेक मंडळांनी प्रतिसाद देवून गणेशमुर्ती अर्पण केल्याबद्दल व विसर्जन मिरवणूक नियोजन पध्दतीने व शांततेने पार पाडल्याबद्दल महापालिकेच्यावतीने सर्व सार्वजनिक मंडळांच्या अध्यक्ष, प्रतिनिधींचे प्रशासक के.मंजूलक्ष्मी यांनी आभार व्यक्त केले. हे विसर्जन व्यवस्थित पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी, आरोग्य, पवडी, सफाई, विद्युत विभागाचे अधिकारी कर्मचारी, अग्निशमन जवान, वैद्यकीय पथक, व्हाइट आर्मी, हमाल, क्रेन चालक यांनी विशेष परिश्रम घेतले. या सर्वांनी सलग दिवस व अहोरात्र काम केल्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार प्रशासकांनी व्यक्त केले.

पापाची तिकटी टीम व क्रांतिवीर भगतसिंग येते वाईट आर्मी रेस्क्यू फ्रेंड सर्कल या मंडळांची शेवटची गणपतीची आरती पहाटे ४.१५ वाजता पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या हस्ते करण्यात आली. मुख्य मिरवणूक मार्गावरून येणाऱ्या शेवटच्या गणेश मुर्तीचे प्रशासक के.मंजूलक्ष्मी व शहर पोलिस उप-अधिक्षक अजित टिके यांच्या हस्ते इराणी खन येथे आरती करण्यात आली. यावेळी पोलिस अधिक्षक महेंद्र पंडित, महापालिकेचे व पोलिस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. इराणी खन येथे शहीद भगतसिंग तरुण मंडळाच्या शेवटच्या गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

दरम्यान महापालिकेच्यावतीने अनंत चतुर्दशी निमित्त सार्वजनिक गणेश विर्सजनाचे मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक संस्था, तरुण मंडळे व तालीम संस्थांचे अध्यक्षांना पापाची तिकटी येथील स्वागत मंडपामध्ये प्रशासक के.मंजूलक्ष्मी व इतर अधिकारी यांच्या हस्ते श्रीफळ, पान, सुपारी व रोप देऊन स्वागत करण्यात आले.

# माघारीचे दोर कापलेत, तुमच्या भरवशावर लढणार : अमित कदम

**मेढा** : कोणी काहीही सांगितले तरी आता माघार नाही, परतीचे दोर केव्हाच कापलेत त्यामुळे तुमच्या भरवशावर आगामी विधानसभा निवडणुक लढवणारच असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष अमित कदम यांनी मेढा येथे केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे मेढा येथे आयोजित जन संवाद मेळाव्यात ते बोलत होते.



यावेळी माजी नगराध्यक्ष बाळासाहेब बाबर, जावली बँकेचे माजी चेअरमन योगेश गोळे, जावली तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष साधू चिकणे, विलास दुंदळे, सोमनाथ कदम दत्तात्रय लकडे, विठल पवार, प्रमोद जाधव, सचिन राजे महाडीक, सुनिल दिवडे, नितिन शिंदे, बाळासाहेब ओंबळे, संजयदादा पाटील, सरपंच विष्णु साळुंखे आदींसह तालुक्यातील कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमित कदम पुढे म्हणाले, जनसामांन्याची समस्या सोडविण्यासाठी आज आपण एकत्र आलो आहोत. तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या मनावर दडपण आहे.

सर्व सामान्य माणसाच्या मनात आले तर ते काहीही करू शकतात. जनतेने हातात घेतलेली ही चळवळ आहे. अमित कदम उभा राहील परंतु तुमची साथ असने गरजेचे आहे. माझ्याकडे कारखाना नाही किंवा सहकारी संस्था नाहीत. पण सामान्य जनतेसाठी मी आहे. विद्यमान नेतृत्वाला बोंडारवाडी चा प्रश्न सोडविता येत नाही. महु हातगेघर धरणाचा प्रश्न प्रलंबीत आहे. ईथला तरुण परगावी जात आहे. मक्तेदारांसाठी विकास नको. त्याच त्याच रस्त्यावर पैसे खर्च करून खड्डे पडताहेत आदी प्रश्न उपस्थित करत आपल्या विरोधकांवर तोफ डागली.

यावेळी उपस्थित लोकांनी संवाद साधताना जावलीतील दशहत संपवा, जावलीत रोजगार उपलब्ध व्हावा, शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत कोणाचे लक्ष नाही त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, अमित कदमांनी उमेवारी जाहीर करावी, दादांच्या पाठीमागे १०० टक्के राहणार, पुनर्वसनाबाबत महसूल विभाग व नेते उदासिन आहेत आदी प्रश्न उपस्थित करत अपेक्षाही व्यक्त केल्या.


यावेळी बाळासाहेब बाबर, साधू चिकणे, नितीन शिंदे यांनी ही आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साधू चिकणे यांनी केले तर आभार योगेश गोळे यांनी मानले.

# पाचगणी फ्लॉवर व्हॅली विविधांगी फुलांनी बहरली

## फुलांचा नजराणा पाहण्यासाठी पर्यटकांना खुणावतेय पर्यटनस्थळ

**वाई** : पाचगणी येथील टेबल पॉइंट, न्यू इरा व संजीवन मैदाने तसेच परिसरातील डोंगरमात्यावरील पठारे विविध रानफुलांनी बहरली असून अनेक पर्यटक आणि पर्यावरणप्रेमी या फुलोत्सवाचा आनंद घेण्यासाठी गर्दी करत आहेत. नाजूक, रंगीबेरंगी रानफुलांची, कुठे गुलाबी तर कुठे निळ्या, कुठे पिवळ्या तर कुठे जांभळ्या रानफुलांची आरास सहय़ाद्रीच्या पठारावर उगवल्याने पर्यटक आकर्षित होत आहेत. ही फ्लॉवर व्हॅली पर्यटकांना खुणावत आहे.

महाबळेश्वर तालुक्यातील पांचगणी येथील प्रसिद्ध टेबल पॉइंट, संजीवन व न्यू इरा स्कूलची मैदाने तसेच भिलार, राजपुरी, आंब्रळ, खिंगर, सायघरची पठारे तसेच करहर पांचगणी रस्ता व काटवली घाट दुतर्फा रंगीबेरंगी फुलांची झालर पडली आहे. एरव्ही उन्हाळ्यात बोडकी दिसणारी पठारे पावसळ्यात मात्र हिरवागार गालीचा पसरलेला पाहयला मिळतो, सरत्या पावसातली गिरीभ्रमंती नेहमीच नेत्रसुखद आणि डोळ्यांचे पारणे फेडणारी असते. जमिनीलगत पसरलेल्या गवतापासून ते शेजारच्या





बळकट झाडाचा आधार घेत वाढणाऱ्या वेलीपर्यंत तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पतींवर ही रानफुले पाहायला मिळतात. पावसाळ्यात हिरवाई असल्याने, त्यावरच्या फुलांचे अस्तित्व लगेच कळते. त्यातही ऊन पावसाची लपाछपी सुरू होते तेव्हा रानफुलांचा खरा मौसम सुरू होतो.

या काळात सगळ्यात आधी लक्ष वेधून घेतात ती कवळ्याची लाल टिका लावलेली पिवळी फुले. या फुलांच्या आकारामुळे त्यांना 'डोनाल्ड डक फ्लॉवर' असे टोपण नावही मिळाले आहे. या कवळ्याच्या म्हणजे स्मिथिया जिनसमधले आणखी काही प्रकार जसे स्मिथिया सेन्सिटिवा (लाजाळू कवळा), स्मिथिया सेतुलोसा (मोठा कवळा) देखील पाहायला मिळतात. पिवळ्या कवळ्याची गुलाबी आवृत्ती म्हणजे स्मिथिया पुरपुरीया अर्थात बरका. या गुलाबी फुलावर पांढरा टिका असतो. पिवळ्या रंगाची आणखी काही रानफुले म्हणजे सोनकी, सोनतारा, पिवळी अबई, पान लवंग. गुलाबी तेरडय़ापासून ते गुलाबी बाभळीपर्यंत विविध छटा पाहायला मिळतात. तेरडय़ातही पुन्हा जांभळा तेरडा, पिवळा तेरडा असे प्रकार आहेतच. जरतारी, बोरपुडी, सुपली, फुलझडी या गडद रंगाच्या फुलांप्रमाणेच नावाप्रमाणेच फिक्या अबोली रंगाचे चिमुकले अबोलिमा देखील लक्ष वेधल्याशिवाय राहात नाही.

या रानफुलांमधील एक अनोखा प्रकार म्हणजे टेरिस्ट्रियल ऑर्किड्स. सर्वसाधारणत: ऑर्किड्स नेहमी झाडावर वाढतात, पण हबेनारिया जीनसमधील ऑर्किड्स मात्र जमिनीवर उगवतात आणि बहरतात. पांढराशुभ्र रंग आणि नजाकतदार पाकळ्या ही यांची ओळख म्हणता येईल. बाहुली हबे आमरी, आषाढ हबे आमरी, उग्र हबे आमरी, पांचगणी हबे आमरी, चिरे हबे आमरी असे जमिनीवरच्या ऑर्किड्सचे अनेक प्रकार गवतावर झुलताना पाहायला मिळतात. रानफुलांच्या जगातील आणखी एक अनोखा प्रकार म्हणजे 'कंदील पुष्प'. पोसिनेशिया कुळातील सेरोपेजिया जीनसचे जे अनेक प्रकार पाहायला मिळतात, त्यांच्या फुलांच्या आकारावरून कंदील पुष्प असे समर्पक नाव मिळाले आहे. सगळ्याच वनस्पती परागीभवनासाठी कीटकांचा उपयोग करतात पण सेरोपिजिया चक्क कीटकांना ओलीस धरून, सक्तीने हे काम करायला लावते आणि मगच त्या कीटकाला सोडते. सेरोपेजियाच्या फुलांची रचनाच तशी असते. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात या फुलांना खरचुडी म्हटले जाते. सेरोपेजिया जैनी, व्हिन्साफोलिया, हिरसुटा, ऑक्युलेटा, सह्य़ाद्रिका असे कंदील पुष्पाचे प्रकार महाराष्ट्रात पाहायला मिळतात.

पावसाळा संपत आला येथे निसर्ग विविध दुर्मिळ असलेल्या फुलांची उधळण करीत असतो.

हा फुल उत्सव नजरेत भरण्यासाठी भरण्यासारखा असतो यामध्ये अनेक निसर्गाच्या अद्भुत गमतीजमती पहावयास व अनुभवयास मिळत असतात ज्या आपण कधीही अनुभवला नसतील हे पुष्पपठार पुष्पांनी आणि विविध दुर्मिळ अशा लहान वनस्पती मी सजलेला आहे लाल नारंगी सर्वत्र फुले फुले दिसतात हिमवृष्टी सारखा फुलांचा गालिचा अंथरलेला असतो.

या फुलांमध्ये सोनकीची फुले पिवळी सोनकी मिकी माऊस स्मिती या पिवळी फुले पृथ्वीराज फुले टूथब्रश आकाराची फुले आरखेड जांभळी फुले सीतेची आसवे पाचगणी च्या नावाने प्रसिद्ध असणारे अनेक विविध जातीची फुले या दिवसात या परिसरात फिरत असतात याची खरी शास्त्रीय नावे अशी पांढरी फुले श्वेत पुष्प ब्राझील भारंगी शेवाळ दगडांना झाडांना चंदेरी नेचे कैलास सिल्वर प्राईस सीतेचे केस मॅडम फर्फर नागवेली टेबल लँड विस्तीर्ण पठारावरील भिमाचा पाय असलेल्या ठिकाणी अगदी लहान दोन-तीन इंच असलेल्या ड्रोसेरा नामक दवबिंदू वनस्पती विंचू ही कीटकभक्षक आहे.